# परिपत्रक

**विषय** :- सल्लामसलत कामात सुसूत्रीकरणाबाबत व एकत्रितरित्या संकल्पन व रेखाचित्र करणेबाबत.

मध्यवर्ती संकल्पचित्र संघटनेत माती धरण मंडळ / दगडी धरण मंडळ / दरवाजे मंडळ / विद्युतगृह मंडळ यांचे मार्फत निमशासकीय, स्थानिक स्वराज्य संस्था व केंद्रिय सरकारचे सार्वजनिक उपक्रम तसेच खाजगी संस्थांसाठी सल्लामसलत तत्वावर मागणीनूसार संकल्पने करुन दिली जातात. या कामासाठी प्रत्येक मंडळाचा त्या मंडळाशी निगडीत संकल्पनाच्या घटकांचा स्वतंत्र करारनामा करण्यात येतो. त्यामुळे मध्यवर्ती संकल्पचित्र संघटनेमार्फत एखाद्या प्रकल्पाचे सर्व घटकांचे पृथक-पृथक संकल्पने दिली जातात.

शासन निर्णय इंग्रजी No.WRD-Restructuring/२००९/(१६/०९)/WR(Est) दि.१२.१०.१० व १९.११.२०१० नुसार मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना ही दि. १.१२.२०१० पासून मुख्य अभियंता, संकल्पन, प्रशिक्षण, संशोधन व सुरक्षितता, मेटा, नाशिक व मा. महासंचालक, संकल्पन, प्रशिक्षण, जलविज्ञान, संशोधन व सुरक्षितता, मेरी, नाशिक यांचे प्रशासकीय व तांत्रिक नियंत्रणाखाली आलेले असल्याने सल्लामसलतीचे संकल्पनाचे कामाबाबत सुसूत्रता व एकात्मिक प्रस्ताव व्हावेत यासाठी खालीलप्रमाणे कार्यपध्दतीचा अवलंब करणे आवश्यक आहे.

"या पुढे एखाद्या संस्थेचा ज्या मंडळाकडे सल्लामसलत कामासंबंधी प्रस्ताव प्राप्त होईल, त्या मंडळाने संबंधित संस्थेशी करारनामा करण्या आधी संकल्पचित्र संघटनेतील सर्व मंडळांशी विचार विनिमय करुन संबंधित घटकांचा करावयाच्या संकल्पनांचा विचार करुन त्या संबंधीचे एकत्रित शुल्क विचारात घेऊन व मुख्य अभियंता (DTRS) यांची मान्यता घेऊन करारनामा अंतिम करावा त्यानुसार सर्व संकल्पने व रेखाचित्रे देण्याबाबत कार्यवाही करावी."

हे निर्देश त्वरीत अंमलात आणावेत. सदर परिपत्रक मा.महासंचालक(DTHRS),मेरी,नाशिक यांचे मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

मुख्य अभियंता<br>
संकल्पन, प्रशिक्षण, संशोधन व सुरक्षितता,<br>
महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनी, नाशिक

जा.क्र.मुअ/संप्रसंवसु/ ६०९ /२०११<br>
संकल्पन, प्रशिक्षण, संशोधन व सुरक्षितता,<br>
महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनी, नाशिक<br>
नाशिक ४<br>
दिनांक -2९मार्च २०११

प्रत, अधीक्षक अभियंता, (दरवाजे /दगडी धरण /माती धरण /विद्युतगृहे / धरण सुरक्षितता संघटना,) मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिक यांना माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

प्रत, अधीक्षक अभियंता व सहसंचालक, महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था, नाशिक यांना माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.